संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक
mandeshexpressatp@gmail.com

दैनिक **माणदेश एक्सप्रेस** माणदेशी बुलंद आवाज..

संपादक : दिपक गौतम प्रक्षाळे
मोबा. ९५९५०४७६७६/९५०३६३८६८६
www.mandeshexpress.com


एम एन जाधव (सर) हॉस्पिटल यांचे
**श्राव्या डायग्नोस्टिक्स**
डिजिटल एक्स-रे सोनोग्राफी सेंटर,आटपाडी
डॉ.सौ. चैताली सतेश जाधव (M.B.B.S. D.M.R.E.)
डॉ. सतेश मधुकर जाधव (M.B.B.S.M.S. D.N.B. F.M.S.)
उपलब्ध सुविधा
* सर्व प्रकारचे डिजिटल एक्स-रे * गरोदर मातांची सोनोग्राफी 4 D स्कॅन व गर्भातील बाळांचे व्यंग निदान करणे * पोटाची, छातीची, थायराईड व स्तनाची अत्याधुनिक (हाय रिझोल्यूशन) स्कॅन * वंधत्वसाठीची आणि पाळीच्या समस्या बाबतच्या सोनोग्राफी * इंटरव्हेशनल सोनोग्राफी * सोनोग्राफीद्वारे गाठीचा तुकडा तपासणे, छातीतील किंवा पोटातील पाणी. पु काढणे. तसेच लिव्हर मधील गाठीचा (Abcess) सोनोग्राफीद्वारे उपचार
पत्ता : ग्रामीण रुग्णालयासमोर, आटपाडी

वर्ष : ६ वे ● ● अंक : ११४ ● ● मंगळवार दि. १२ मार्च २०२४ ● ● किंमत २ रु ● पाने : ४ ● RNI : MAHMAR/2017/77021

# पै. चंद्रहार पाटलांचा शिवसेना ठाकरे गटात प्रवेश

## ठाकरे गटाच्या संघटकपदी चंद्रहार पाटील यांची नियुक्ती : उद्धव ठाकरे

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

मुंबई : डबल महाराष्ट्र केसरी पै. चंद्रहार पाटील यांनी काल (दि. ११) शेकडो कार्यकर्त्यांसह हाती शिवबंधन बांधत, मुंबईत मातोश्रीवर पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत शिवसेना ठाकरे पक्षात प्रवेश केला. जिल्ह्यातून शक्तिप्रदर्शन करीत कार्यकर्ते मातोश्रीवर दाखल झाले होते. गेल्या काही दिवसांपासून चंद्रहार पाटील यांच्या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातील प्रवेशाच्या चर्चा सुरु होत्या. काल या चर्चेला पूर्णविराम मिळाला आहे.

पक्षप्रवेश करतेवेळी उद्धव ठाकरे म्हणाले, चंद्रहार यांच्या सह सर्वांचे मी मातोश्रीवर स्वाागत करतो. आज माझी छाती अभिमानाने फुलून आली आहे. चंद्रहार सारखा पैलवान असला तर सांगलीसह महाराष्ट्रा त आपल्यी विरुद्धश कोणी लढणयाची हिंमत करणार नाही. नामर्द पळून जात आहेत तर मर्द शिवसेनेत येत आहेत, असा टोलाही यावेळी उद्धव ठाकरे यांनी लगावला. गदा आणि मशाल घेवून एक मर्द आम्हीर दिल्लीहला पाठविणार आहोत, असे सांगत त्यांळनी सांगली लोकसभा मतदारसंघातून चंद्रहार पाटील यांची उमेदवारीही जाहीर केली. सांगली शिवसेना ठाकरे गटाच्याआ संघटकपदी चंद्रहार पाटील यांची नियुक्तील केल्यासचेही ठाकरे यांनी जाहीर केले.

लोकसभेच्या आखाड्यात उतरणार यावर चंद्रहार पाटील पहिल्यापासून ठाम आहेत. गेल्या वर्षभरापासून ते लोकसभा निवडणुकीची जोरदार तयारी करीत आहेत. बैलगाडा शर्यत, रक्तदान शिबिर महारॅली, गावोगावी संपर्क अभियान राबवून त्यांनी लोकसभा निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याचा मनसुबा अगोदरच व्यक्त केला होता.

लोकसभा लढवायचा निर्णय पक्का केल्यानंतर त्यांनी विविध पक्षाच्या नेत्यांच्या भेटीगाटी घेऊन चर्चा केली होती. विशेषतः शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते खासदार संजय राऊत यांच्याशी त्यांचा सातत्याने संपर्क होता. मात्र लोकसभा सांगली मतदारसंघातून तिकीटाची हमी मिळाल्याशिवाय पक्ष प्रवेश करायचा नाही, असा त्यांचा प्रयत्न होता. त्यासाठी त्यांनी पक्ष श्रेष्ठींसोबत दोन-तीन चर्चेच्या फेर्याय केल्या. मातोश्रीवर भेट देऊन त्यांनी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्याशी चर्चा केली. त्यानंतर पक्षाचे नेते खा. संजय राऊत यांच्याशीही त्यांच्या वारंवार चर्चा होत होत्या.

शनिवारी पुण्यात खासदार संजय राऊत यांच्यासमवेत चर्चा झाल्यानंतर पाटील यांच्या प्रवेशावर शिक्कामोर्तब करण्यात आले होते. त्यानंतर चंद्रहार पाटील यांनी मतदारसंघात परत येऊन प्रवेशाची तयारी केली. शिवसेना जिल्हाप्रमुख संजय विभुते यांच्याशी चर्चा करुन त्यांनी प्रवेश निश्चित केला.



**मुंबई : मातोश्री येथे चंद्रहार पाटील यांनी उद्धव ठाकरे यांच्या हस्ते शिवसेना ठाकरे गटात प्रवेश केला. यावेळी चंद्रहार पाटील यांना गदा देवून त्यांचे पक्षात स्वागत करताना उद्धव ठाकरे, संजय राऊत, संजय विभूते व उपस्थित मान्यवर**




# देशात सीएए कायदा लागू

## निवडणुकीआधी मोदी सरकारकडून मोठा निर्णय

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

नवी दिल्ली: लोकसभा निवडणुकीच्या आधी केंद्रातील मोदी सरकारने मोठी घोषणा केली आहे. केंद्र सरकारने सीएएची अधिसूचना जारी केली असून देशात सीएए लागू झाला आहे. केंद्रीय गृहमंत्रालयाकडून यासंदर्भात नोटीफिकेशन जारी करण्यात आले आहे. लोकसभा निवडणुकीच्या आधी मोदी सरकारकडून घेण्यात आलेला हा मोठा निर्णय असल्याचे मानले जात आहे.

या कायद्यामुळे भारताच्या शेजारी असलेल्या ३ देशातील अल्पसंख्यांक नागरिकांना देशातील नागरिकता मिळेल. यासाठी त्यांना केंद्र सरकारद्वारे तयार करण्यात आलेल्या ऑनलाइन पोर्टलवरून अर्ज करावा लागेल.

भाजपने २०१९च्या लोकसभा निवडणुकीत सीएएचा जाहीरनाम्यात समावेश केला होता. पक्षाने हा मुद्दा अनेकवेळा उपस्थित देखील केला होता. गेल्या काही दिवसात केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी अनेक भाषणात सीएए लागू करणार असल्याचे म्हटले होते. त्यामुळे केंद्र सरकार निवडणुकीच्या आधी याची अधिसूचना जारी करेल अशी चर्चा होती. त्यानुसार आता केंद्राने याची अधिसूचना जारी केली आहे.

सीएए कायदा लागू होणार याची चर्चा आज दुपारपासून सुरू होती. त्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी साडेपाच वाजता देशाला उद्देशून भाषण करतील अशी बातमी समोर आली. पण मोदींनी ५.३० वाजता मिशन दिव्यास्त्रसाठी डीआरडीओचे अभिनंदन करणारे ट्विट केले. त्याच बरोबर ते देशाला संबोधित करणार नाहीत अशी माहिती दिली गेली.

सीएए आज रात्री उशिरा लागू गेले जाईल अशी देखील चर्चा होती. पण मोदींचे संबोधन होणार नाही याची माहिती आल्यानंतर काही मिनिटातच केंद्रीय गृहमंत्रालयाने सीएएचे नोटिफिकेशन जारी केल्याची माहिती दिली. सीएए कायदा २०१९ साली संसदेत मंजूर करण्यात आला आहे.

सीएएमुळे मुस्लिम धर्माव्यतिरिक्त भारताच्या शेजारी असलेले ३ मुस्लिम देशातून देणाऱ्या अन्य धर्मातील लोकांना भारताचे नागरिकत्व मिळू शकेल. यासाठी केंद्र सरकारने एक वेब पोर्टल तयार केले आहे. हे पोर्टल नोटिशिकेशननंतर लॉन्च केले जाईल. यात बांगलादेश, पाकिस्तान आणि अफगाणिस्तान या ३ देशातील नागरिकांचा समावेश असेल. वेब पोर्टवर नोंदणी केल्यानंतर आणि सरकारकडून तपासणी प्रक्रिया पार पाडल्यानंतर संबंधित व्यक्तीला भारताचे नागरिकत्व मिळेल. वरील ३ देशातून आलेल्या व्यक्तीला अल्पसंख्यांक असल्याचे कोणतेही कागदपत्र द्यावे लागणार नाही. बांगलादेश, पाकिस्तान आणि अफगाणिस्तान या ३ देशातील सहा अल्पसंख्यांक हिंदू, शिख, जैन, बैद्ध,पारसी आणि ख्रिश्चन या धर्मातील नागरिकांना भारताचे नागरिकत्व मिळण्याची तरदूत सीएए कायद्यात केली आहे.

# करगणी यात्रेत खिलार जनावरांचे प्रदर्शन : पै. संतोष पुजारी

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

आटपाडी/प्रतिनिधी : आटपाडी तालुक्यातील करगणी येथे श्री. लखमेश्वर देवाच्या यात्रेनिमित्त खिलार जनावरांचे भव्य प्रदर्शन भरविण्यात येणार असून यामध्ये शेतकरी वर्गाने मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन आटपाडी बाजार समितीचे सभापती पै. संतोष पुजारी यांनी केले आहे.



पै. संतोष पुजारी

करगणी येथे श्री. लखमेश्वर देवाची यात्रेनिमित्त जनावरांची यात्रा भरणार आहे. सदरची यात्रा ही आटपाडी बाजार समिती व ग्रामपंचायत करगणी यांच्या संयुक्त विद्यमाने भरविण्यात येणार आहे. या यात्रेनिमित्त दिनांक १३ रोजी खिलार जनावरांचे भव्य प्रदर्शन भरविण्यात येणार आहे.

तरी यात्रेनिमित्त संपन्न होणाऱ्या खिलार जनावरांच्या प्रदर्शनामध्ये सर्व शेतकरी बांधवानी सहभागी होवून या प्रदर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन पै. संतोष पुजारी यांनी केले आहे.

# देशाच्या घटनेत बदल करण्याचे भाजपाचे स्वप्न; शरद पवार

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

बारामती : देशाच्या घटनेत बदल करण्याचे स्वप्न भाजपचे नेतृत्व पाहत आहे आणि त्यासाठीच भाजपा मत मागत आहे. घटना बददलली तर सामान्य माणसाचे अधिकार उध्दवस्त होतील, अशा शब्दात ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी भाजपवर निशाणा साधला.

बारामती येथे आयोजित समस्त होलार समाज विकास मेळाव्यात पवार बोलत होते. यावेळी पवार म्हणाले, अनेक देशात लोकशाही असुन देखील संविधान मजबुत नसल्याने सरकार नीट चालत नाही. मात्र,डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहीलेल्या राज्यघटनेमुळे आपला देश एकसंघ राहीला. मात्र,सध्या ज्यांच्या हातात देशाची सत्ता आहे. त्यांना वेगळ्या दिशेने देशाचा गाडा चालवायचा आहे. भाजपाचे कर्नाटकातील खासदार अनंतकुमार हेगडे यांनी काल-परवा केलेल्या भाषणात विशेष बहुमत मिळाल्यास घटनेत बदल करू आणि यासाठी मोदींच्या पाठीशी राहणाचं आवाहन केलं. हे भयानक षडयंत्र शिजतंय. एकदा घटना बदलली, तर तुमचे आमचे सगळे अधिकार गेले. याला कडाडून विरोध केला पाहिजे. आपला शाहू-फुले-आंबेडकर विचार संकटात सापडला आहे. तुम्हा-आम्हाला वेळीच खंबीर पावले उचलावी लागतील,असे पवार म्हणाले.

मी मुख्यमंत्री होतो,त्यावेळी मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचं नाव दिलं.तेव्हा संपुर्ण महाराष्ट्रात दंगे, जाळपोळ सुरु झाली. मात्र ज्या महान व्यक्तीने संपुर्ण देशाला घटना दिली. त्यांचे नाव देणे गुन्हा वाटत असेल तर तो मी केला.त्याची आम्हाला फिकीर नाही. देशात जातीयवादी डोकं वर काढतायेत. या प्रतिगामी शक्तींचा आपल्याला पराभव करायचा आहे. बारामतीकडे संपुर्ण देशाचे लक्ष आहे. मला खात्री आहे की, बारामतीचा मतदार विचारापूर्वक निकाल घेईल,असे पवार म्हणाले.

# सांगलीतील वसंतदादा बँकेची देखणी इमारत काळाच्या पडद्याआड

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

सांगली : सहकारी बँकांच्या इतिहासात सर्वात सुंदर वास्तू म्हणून सांगलीच्या वसंतदादा सहकारी बँकेच्या इमारतीची ओळख होती. बँकेची ही देखणी इमारत आता काळाच्या पडद्याआड जात आहे. इमारतीची खरेदी केलेल्या कंपनीने येथे मोठे बांधकाम सुरू केले असून जुनी इमारत दृष्टीआड गेली आहे.

वसंतदादा बँकेची मुख्य इमारत डेक्कन इन्फ्रा कंपनीने १० कोटी ७३ लाखांना लिलावात खरेदी केली आहे. खरेदीनंतर बँकेचा फलक हटवून कंपनीचा फलक लावण्यात आला होता. काही दिवस ही इमारत आहे तशीच उभी होती. मात्र, गेल्या काही दिवसांपासून कंपनीने दर्शनी भागात बांधकाम सुरू केले असून हळूहळू जुनी इमारत दृष्टीआड जात आहे. काळाच्या पडद्याआड जाणारी ही इमारत पाहून सहकार क्षेत्रातील कार्यकर्त्यांच्या मनाला वेदना होत आहेत.

बँकेचे तत्कालीन अध्यक्ष दिवंगत मदन पाटील यांच्या प्रयत्नातून सांगली-मिरज रस्त्यावर भव्य, सुसज्ज व अत्याधुनिक अशी चार मजली इमारत बांधण्यात आली. राष्ट्रवादीचे नेते शरद पवार यांच्या हस्ते २००१ मध्ये या इमारतीचे उद्घाटन झाले होते. कालांतराने आर्थिक घोटाळ्यांमुळे ही बँक अडचणीत आली. त्यानंतर बँक अवसायनात काढण्यात आली.

२०१९ मध्ये तत्कालीन अवसायक निळकंठ करे यांनी ही इमारत विकण्याबाबतची परवानगी सहकार विभागाकडून मागितली होती. त्यानंतर त्यांनी लिलाव प्रक्रिया राबवून डेक्कन इन्फ्रा कंपनीला १० कोटी ७३ लाखाला ही इमारत विक्रीबाबतचा प्रस्ताव कायम केला. या लिलाव प्रक्रियेविरुद्ध ठेवीदार संघटना, अन्याय निर्मूलन समिती व अन्य संघटनांनी तत्कालीन सहकार मंत्री बाळासाहेब पाटील यांच्याकडे तक्रार केली होती. पाटील यांनी या लिलाव प्रक्रियेला स्थगिती दिली होती. २०२३मध्ये स्थगिती उठविण्यात आली व लिलाव कायम करण्यात आला. आता कंपनीने बँकेच्या इमारतीचा ताबा घेऊन त्याठिकाणी बांधकामास सुरुवात केली आहे.

# मतदासंघातील एक ही रुग्ण उपचारापासून वंचित राहू देणार नाही

## संग्राम देशमुख : कडेगांवात मोफत जिल्हास्तरीय महाआरोग्य शिबिर संपन्न : १७७६ रुग्णांना लाभ

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

कडेगाव : कोरोना काळामध्ये जे रुग्ण वाचले त्याला वाचवण्यासाठी आरोग्य खात्याचे लाखमोलचे योगदान आहे. आज केंद्र व राज्य सरकारच्या वतीने पाच लाखाच्या आतील सर्व उपचार मोफत होत आहेत. कडेगाव तालुका आरोग्य यंत्रणेच्या बाबतीत खूप मागास आहे. मयत झालेल्या माणसाची बॉडी ठेवण्यासाठी कराड अथवा विटा या ठिकाणीं जावे लागते. पण काळजी करण्याचे कारण नसून कडेगाव नगरपंचायतीवर सत्तांतर झाल्यानंतर भाजपाचे नगराध्यक्ष धनंजय देशमुख यांनी त्याचा पाठपुरावा केल्यामुळे डीपीडीसी मधून मोठा निधी मिळाला असून त्यांचीही सोय आता होणार आहे. राजकारण हे क्षणभंगुर आहे. जे काही करता येईल ते आपल्या भागातील लोकांसाठी काम केले पाहिजे. लवकरच १५० बेडचे हॉस्पिटल आपण उभारणार असून मतदारसंघातील एकही रुग्ण उपचारापासून वंचित राहू देणार नसल्याचे प्रतिपादन सांगली जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संग्राम देशमुख यांनी केले.

ते कडेगांव या ठिकाणी लोकनेते आमदार स्व.संपतराव देशमुख यांच्या स्मृतीप्रित्यर्थ मोफत जिल्हास्तरीय आरोग्य महाशिबीरामध्ये बोलत होते. यावेळी विश्वतेज देशमुख,कडेगाव चे नगराध्यक्ष धनंजय देशमुख, उपनगराध्यक्षा नाजनीन पटेल, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.विक्रमसिंह कदम, प्रांताधिकारी रणजीत भोसले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.मिलिंद पारे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. आशा चौगुले, राजाराम गरुड, प्रमुख उपस्थितीत होतें.

यावेळी बोलतांना डॉ.विक्रमसिंह कदम म्हणाले जिल्हा परिषद अध्यक्ष असताना भाऊंनी ज्या त्या भागातील लोकप्रतिनिधींच्या नावे आरोग्य शिबिरे घेण्यास सुरुवात केली. लोकांच्या आरोग्यासाठी खूप मोठी तळमळ संग्राम भाऊंना असल्यामुळे त्यांनी हे आरोग्य शिबिर भरवण्याचे खूप मोठे योगदान या क्षेत्रात दिले आहे. यावेळी प्रांताधिकारी रणजीत



**कडेगांव या ठिकाणी लोकनेते आमदार संपतराव देशमुख यांच्या स्मृतीप्रित्यर्थ मोफत जिल्हास्तरीय आरोग्य महाशिबिराचे उदघाटन प्रसंगी बोलताना संग्राम देशमुख उपस्थित समुदाय**

भोसले म्हणाले की ग्रामीण भागातील लोकांनी एका छताखाली येऊन या आरोग्य शिबिराचा लाभ घेता येईल हे उद्दिष्ट ठेवून नियोजन केले. विशेष महिलांनी आरोग्याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.व या आरोग्य शिबिरात महिलांची तुफान गर्दी दिसत असल्याने नक्कीच या आरोग्य शिबिराचा लाभ माता-भगिनींना होणार आहे.

अपघाती निधन झालेल्या आशा सेविका सुषमा डोंगरे यांना आदरांजली वाहण्यात आली. तालुक्यातील ८५ क्षय रुग्णांना संग्रामसिंह देशमुख यांनी पुर्ण पणे बरे होईपर्यंत दत्तक घेतले.यावेळी स्वागत व प्रस्ताविक डॉ. अशा चौगुले यांनी केले तर आभार पत्रकार शांताराम कुंभार यांनी मानले.

कार्यक्रमास अशोक साळुंखे, रोहित पाटील, विकास सूर्यवंशी, चंद्रकांत पाटील,आबासो करांडे, हिंदुराव यादव, संग्राम यादव,सभापती शुभदा देशमुख, मनीषा रजपूत रंजना लोखंडे, दीपा चव्हाण, विद्या खाडे, संजीवनी डांगे, शंकर मोहिते, आशपाक पठाण, प्रकाश गडळे, महेंद्र पवार, उत्तम चव्हण, हनमंतराव कदम, बाबजी तात्या,विजय गायकवाड ,मंदाताई कारंडे,अमोल डांगे, विजय खाडे, आशपाक पठाण, विकास सूर्यवंशी, अर्चना घाडगे, संतोष डांगे, प्रकाश गायकवाड, संभाजी यादव, माणिक मोरे, नीलेश लंगडे,मूकतार पटेल, तानाजी जाधव, दादा गायकवाड, बाळुभैय शेख, भुजंग माळी, देवदास नांगरे, विलास धर्मे, बबन रासकर, संग्राम घार्गे, राजेंद्र दीक्षित संभाजी देसाई समीर इनामदार, किशोर मिसाळ, दत्तात्रय क्षीरसागर, विद्या पवार यांच्या सह आरोग्य विभिगाचा स्टाप तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## * संपादकीय *

# कोकणाची मुंबई करू नका!

राज्य सरकारने आता कोकणाच्या किनारपट्टीच्या भागातील आणि पालघर, रायगड, सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी या जिल्ह्यांमधील एक हजार ६३५ गावांच्या नियोजनाचे काम 'सिडको'कडे सोपविण्याचा निर्णय घेतला आहे.

कोकणाचा एकूण विस्तार मोजला तर पाच जिल्ह्यांचे ४७ तालुके येतात. यात एकूण गावे पाच हजार ६८१ येतात. यात आधीच शहरीकरण झालेले जिल्हे आणि शेकडो गावेही आहेत. राज्य सरकारने आता कोकणाच्या किनारपट्टीच्या भागातील आणि पालघर, रायगड, सिंधुदुर्ग आणि रत्नागिरी या जिल्ह्यांमधील एक हजार ६३५ गावांच्या नियोजनाचे काम 'सिडको'कडे सोपविण्याचा निर्णय घेतला आहे. 'सिटी अँड इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन' म्हणजेच शहर आणि औद्योगिक विकास महामंडळाची स्थापना १९७० मध्ये झाली आहे. राज्य सरकारच्या बऱ्या चाललेल्या आणि यशस्वी झालेल्या उपक्रमांपैकी हा एक आहे. नवी मुंबई साकारण्यातील 'सिडको'चा वाटा सर्वांना माहीत आहे. याशिवाय, राज्यभरात अनेक नवनगरे विकसित करण्याचे काम सिडकोने केले आहे. छत्तीसगडसारख्या राज्यांना नवी नगरे विकसित करण्यासाठी आराखडे बनवून देण्याचे कामही सिडकोकडे आले होते. कोकणातील सिंधुदुर्गचे जिल्ह्याचे ठिकाण ओरस, नवा जिल्हा पालघर तसेच वसई-विरार उपप्रदेश यांचीही कामे सिडकोकडे देण्यात आली. स्वतंत्र महापालिका झाल्यावर आपले काम सिडकोने वसई-विरार महापालिकेकडे दिले. वसई-विरारच्या विकासासाठी 'सिडको'च्या नेमणुकीच्या विरोधातच मोठे आंदोलन उभे राहिले होते, याचे इथे स्मरण करून द्यायला हवे. 'सिडको'कडे हे काम शरद पवार मुख्यमंत्री असताना देण्यात आले होते. तो निर्णय चूक होता. फार विलंबाने राज्य सरकारने तो फिरविला. मात्र, त्या निर्णयाची राजकीय किंमत तेव्हाच्या सत्ताधाऱ्यांना मोजावी लागली होती. आजचे राज्य सरकार कोकणातील दीड हजारांहून अधिक गावांच्या विकासाची रूपरेखा 'सिडको'कडे सोपवून साडेतीन दशकांनंतर तेव्हा शरद पवार यांनी केलेलीच चूक नव्याने करीत आहे.

या निर्णयामागच्या राजकीय अंगाचा समाचार घेता येईलच. मात्र, त्या आधी महाराष्ट्राला लाभलेल्या ७२० किमी लांबीच्या नितांतसुंदर किनारपट्टीच्या आणि किनारी नसणाऱ्या कोकणाच्या विकासाची नेमकी कोणती दीर्घकालीन दृष्टी आजवरच्या राज्य सरकारांनी दाखविली आहे; असा प्रश्न विचारावा लागेल. कोकणाचा विकास म्हणजे बेबंद शहरीकरण, उठवळ व ओरबाडू पर्यटन आणि कोकणाच्या निसर्गाची ठेवण बदलणे नाही; याचे भान सरकार नावाच्या यंत्रणेला आहे का? खरेतर कोकण म्हणजे एकटा महाराष्ट्र नाहीच. महाराष्ट्र ते थेट केरळ असा कोकणाचा समन्वित, साकल्याने विचार व्हायला हवा. ज्येष्ठ वैज्ञानिक माधव गाडगीळ यांनी नेमका हाच विचार करून अहवाल दिला; त्याला आता १३ वर्षे होतील. 'वेस्टर्न घाट्स इकॉलॉजी एक्सपर्ट पॅनेल'ने वनस्पती, मासे, सर्प, पक्षी, उभयचर आणि सस्तन प्राणी आदींच्या देशभरातील एकूण प्रजातींच्या ३० टक्क्यांहून अधिक प्रजाती या पश्चिम घाटक्षेत्रात आढळतात, असे म्हटले होते. 'सिडको'ला हे सगळे समजते का? माधव गाडगीळ यांच्यावर टीका करण्यात स्वत:ला कोकण-हिरे समजणारे अनेक आघाडीवर होते. आजही त्यांना हा अहवाल कोकण विकासाच्या विरोधात वाटतो. गाडगीळ अहवाल पातळ करण्याच्या उद्देशानेच डॉ. कस्तुरीरंगन यांची समिती नेमली होती का? पण तिनेही मूळ अहवालातील बऱ्याच तरतुदी उचलून धरल्या. कोकणातील ३७ टक्के परिसर पर्यावरणीय दृष्ट्या संवेदनशील असून किमान ६० हजार चौरस किमी क्षेत्रातील पर्यावरण वाचविण्यासाठी तातडीने पावले टाकायला हवीत, असे ज्येष्ठ वैज्ञानिक असलेल्या डॉ. कस्तुरीरंगन यांनी बजावून सांगितले होते. नुसत्या इमारती, रस्ते आणि बांधकामे उठविणाऱ्या 'सिडको'ला हे सगळे समजते का? 'सिडको'ची मुळात रचनाच तशी नाही. त्यामुळेच, कोकणासारखा अत्यंत संवेदनशील परिसर सिडकोच्या ताब्यात देण्याचा निर्णय चूक व भविष्यात घातक परिणाम करणारा ठरू शकतो.

देशाला पाच ट्रिलियन डॉलर आणि महाराष्ट्राला वन ट्रिलियन डॉलरच्या स्वप्नाने सध्या ग्रासले आहे. असा कोणताही एक आकडा म्हणजे सर्वांगीण विकास नसतो. अशी आकड्यांची फेकाफेक म्हणजे मूळ संकल्पनांचे सुलभीकरण व सुमारीकरण असते. वन ट्रिलियनच्या स्वप्नात कोकणाला जुंपण्यासाठी तर ही 'सिडको'ची एंट्री झालेली नाही ना? कोकणाच्या विकासासाठी आजवर जी मंडळे आणि महामंडळे झाली; त्यांनी पुरेसे काम केले आहे का, याचाही या निमित्ताने विचार करायला हवा. सिडको स्थापन होत असतानाच १९७० मध्ये तेव्हाच्या ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांच्या नियोजनबद्ध औद्योगिक विकासासाठी 'कोकण विकास महामंडळ' स्थापन करण्यात आले होते. ते आज कुठे आहे? हे महामंडळ पुरते निष्प्रभ होण्याआधी त्याची उपासमार नेमकी कुणी केली होती? खरेतर, केंद्र सरकारने पुढाकार घेऊन पश्चिम घाट परिक्षेत्र असणाऱ्या गुजरात, महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक, तामिळनाडू आणि केरळ या सहा राज्यांच्या किनारी भागांचा 'चिरंजीव विकास' कसा व किती करायचा; यासाठी एक उच्चाधिकार मंडळ बनवायला हवे. त्यासाठी, या सहा राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची समिती नेमायला हवी. ईर्शाळवाडी पृथ्वीच्या पोटात दबली की तिथे धावायचे आणि दुसरीकडे, कोकणाचा भविष्यवेधी, सर्वांगीण विचार न करता विकासाच्या कोत्या चौकटीत त्याला बसवायचे; हे चालणार नाही.

# हिटलरी काळाचा तुकडा




डॉल्फ हिटलर आठ नोव्हेंबर, १९२३ रोजी म्युनिचच्या पुत्श बियर हॉलमधे घुसला आणि तिथली एक सभा उधळून लावताना आपण जर्मनीत क्रांती केली आहे, असे त्याने जाहीर करून टाकले. क्रांतीनंतर जर्मनी काय करणार, हेही त्याने सभेत सांगून टाकले. लोकशाही बुडवू, ज्यू-कम्युनिस्ट-विरोधक यांना तुरुंगात घालू, त्यांना मारून टाकू वगैरे. क्रांती झालीच नव्हती. दुसऱ्या दिवशी म्युनिचमधल्या सरकारी इमारती ताब्यात घेण्याचा प्रयत्न हिटलरने केला. तो निष्फळ ठरला. पोलिसांनी झाडलेली गोळी त्याच्यापासून सहा इंचावरच्या सहकाऱ्याला लागली, हिटलर वाचला. त्याला अटक झाली. तुरुंगवास झाला. आठ महिन्यांनी तुरुंगाबाहेर आल्यावर हिटलरने संघटना बांधायला घेतली आणि अनेक निवडणुका लढवत शेवटी ३४ टक्के मतांच्या आधारे जर्मनीचा चॅन्सेलर झाला. पुढे काय झाले ते सांगायला नको. लेखक वोल्कर उलरिच जर्मनीच्या इतिहासाचे मान्यवर अभ्यासक आहेत. बियर हॉल घटनेच्या आठ दिवसांच्या घटनाक्रमावर '१९२३ मधले आठ दिवस' असे स्वतंत्र पुस्तक उलरिच यांनी लिहिले आहे. तर 'जर्मनी १९२३ : हायपरइन्फ्लेशन, हिटलर्स पुत्श अँड डेमॉक्रॅसी इन क्रायसिस' या पुस्तकात १९२३ या वर्षातल्या घटनाचक्राचा वेध लेखकाने घेतला आहे.

तो काळ जर्मनीतील संघर्षमय जीवनाचा होता. लोकशाही अडखळत होती. बहुपक्षीय आघाड्या सरकारे बनवत होत्या. त्यांना अर्थव्यवस्था सांभाळता येत नव्हती. जर्मनीतले मार्क हे चलन कागदाच्या कपट्यापेक्षाही निरर्थक झाले होते. एक डॉलरबरोबर हजारो मार्क अशी स्थिती झाली. जर्मनीत अराजक माजले, राजकीय पोकळी झाली. या पोकळीत हिटलर घुसला. अर्थात, त्यासाठी पुढे दहा वर्षे हिटलरला मेहनत करावी लागली. जर्मनीतल्या या देशी घटनाचक्राचा धावता मागोवा लेखकाने घेतला आहेच. पण त्याहीपेक्षा जर्मनीतल्या या घटना आंतरराष्ट्रीय स्थितीशी कशा जोडल्या गेल्या आहेत, ते दाखवले आहे, सविस्तर.

पहिले महायुद्ध घडवून केलेल्या नुकसानीची भरपाई जर्मनी करू शकत नव्हते म्हणून फ्रान्स आणि बेल्जियमने १९२३ मध्येच जर्मनीवर स्वारी केली. जर्मनीच्या आर्थिक समृद्धीचे केंद्र असलेला रूर हा खाणींचा प्रांत फ्रान्सने काबीज केला. लष्करी कारवाई केली. या कारवाईत जर्मन स्त्रियांवर बलात्कार झाले, नागरिकांवर अत्याचार झाले. जर्मनीत फ्रान्सबद्दलच चिडीची भावना उफाळून आली. जर्मनीतल्या दहशतवादाची मुळे या घटनेत आहेत. फ्रेंच अधिकारी, फ्रेंचधार्जिणे जर्मन-ज्यू पुढारी याच घटनाचक्रात मारले गेले. मारणारे लोक जर्मनीत हुतात्मे झाले. सहा वर्षं आधी रशियात राज्यक्रांती झाली होती. झारशाही उलथवून कम्युनिस्ट राजवट आली होती. कम्युनिस्ट क्रांतीला अत्याचाराची, विरोधकांचा नायनाट करण्याची दाट छटा होती. खूप सामान्य माणसे कम्युनिस्ट अत्याचाराला कंटाळून जर्मनीच्या आश्रयाला आली होती. त्यांना कम्युनिस्ट शैलीची क्रांती जर्मनीत नको होती. पण समांतर पातळीवर जर्मनीतले अनेक पुढारी रशियातल्या कम्युनिस्ट क्रांतीने भारावून गेले होते, तिथला अनुभव न घेता.

मार्क्स जर्मन होता हे त्यांच्या भारावलेपणाचे एक कारण असेल काय? त्यांना जर्मनीत कम्युनिस्ट शैलीची सशस्त्र क्रांती करायची होती. जर्मनीत शस्त्रांचा सुळसुळाट झाला होता. शस्त्रे हा माणसाच्या दैनंदिन पोषाखाचा एक भाग झाला होता. लेखकाने जर्मनी आणि युरोपातल्या घटनांचे विपुल, प्रसंगी समजायला कठीण जाणारे तपशील मांडले आहेत. त्यातल्या घटनांची जोडणी करणे हे वाचकाला थोडे कठीण जाते. परंतु अभ्यासकांना मात्र हे पुस्तक उपयुक्त आहे. जर्मनी समजून घेण्यासाठी लागणारी साधने लेखकाने पुस्तकात दिली आहेत. उलरिच यांनी आधी 'हिटलर : असेन्ट १८८९-१९३९' हे पुस्तक या आधी लिहिले आहे. त्यात हिटलरच्या व्यक्तिमत्त्वावर लेखकाने सविस्तर प्रकाश टाकला आहे. त्या पुस्तकातून हिटलर आणि त्याच्या महत्त्वाकांक्षेमुळे जर्मनीचा झालेला प्रवास समजतो. तर 'जर्मनी १९२३' पुस्तकात व्होल्कर उलरिच यांनी, त्या वेळची पत्रे, आठवणी, वर्तमानपत्रातील लेख आणि इतर स्रोतांचा आधार घेऊन अनेक अर्थाने उलथापलथ घडलेल्या 'त्या' बारा महिन्यांचा इतिहास मांडला आहे.

# खाशाबा जाधव चषक राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा : भाग्यश्री फंडने पटकावले जेतेपद

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

उदगीर : आंतरराष्ट्रीय कुस्तीपटू व महाराष्ट्र केसरी किताबाची मानकरी असलेल्या भाग्यश्री फंड हिने अपेक्षेप्रमाणे आपल्या गटात निर्विवाद वर्चस्व गाजवित स्व. खाशाबा जाधव चषक राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेचा फड गाजविला. याचबरोबर संजना बागडी, आश्लेषा बागडे, गौरी पाटील यांनीही आपापल्या वजनी गटात बाजी मारत सुवर्णपदकाला गवसणी घातली.



राज्य शासनाच्या क्रीडा व युवक संचलनालयाच्या वतीने उदगीर येथील तालुका क्रीडा संकुलामध्ये ही राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धा सुरू आहे. श्रीगोंद्याच्या (जि. नगर) भाग्यश्री फंड हिने ६२ किलो गटातील अंतिम लढतीत सांगलीच्या पुजा लोंढेला पहिल्या फेरीतच लोळविले. लढतीला सुरूवात होताच भाग्यश्रीने एकेरी पटात घुसून पुजाच्या पाठीवर स्वार होत २ गुणांची कमाई केली. त्यानंतर भाग्यश्रीच्या मगरमीठीतून पुजाला स्वत:ची सुटका करून घेता आली नाही. मग भारंदाज डावावर सलग ८ गुणांची कमाई करीत भाग्यश्रीने पहिल्या फेरीतच पूजाचा खेळ खल्लास करीत सुवर्णपदक जिंकले. भाग्यश्रीने फायनलपर्यंतच्या प्रवासातही एक मिनिटांतच सर्व कुस्त्या मारून उदगीरचा राज्यस्तरीय आखाडा गाजविला, हे विशेष. पुजा लोंढे रौप्यपदकाची मानकरी ठरली, तर सातार्याच्या सिद्धी कणसेने कांस्यपदकाची कमाई केली.

महिलांच्या ७२ किलो गटातील सुवर्णपदकाच्या लढतीत सांगलीच्या संजना बागडी हिने लातूरच्या आराधना नाईकचा १०-० फरकाने फडशा पाडला. आराधनाला रौप्यपदकावर समाधान मानावे लागले, तर सातार्याची प्रिती पाटील व नगरची सोनिया सरक यांना कांस्यपदके मिळालीत. ५७ किलो गटात सातार्याची आश्लेषा बागडे व लातूरची अंकिता जाधव यांच्यात तोडीस तोड लढत झाली. लढत २-२ अशी बरोबरीत असताना आश्लेषाने चितपट कुस्ती मारून सुवर्णपदकावर आपले नाव कोरले. रौप्यपदकावर समाधान मानावे लागल्याने अंकिता निराश झाली. पिंपरी-चिंचवडची निर्मिती मुन्हे व कोल्हापूर शहरची श्रद्धा कुंभार यांनी कांस्यपदकांची कमाई केली. ५३ किलो गटातील अंतिम लढतीत कोल्हापूरच्या गौरी पाटीलने कोल्हापूरच्याच तृप्ती गुट्टा हिला १२-३ गुण फरकाने धुळ चारत सुवर्णपदकाची कमाई केली. सेजल धरपळे पल्लवी बागडी यांना कांस्यपदके मिळाली

दोन दिवसात पार पडलेल्या स्पर्धेतील विजेत्यांना राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री ना. संजय बनसोडे यांच्या हस्ते पारितोषिक देण्यात आले. यावेळी क्रीडा उपसंचालक संजय सबनीस,क्रीडा उपसंचालक उदय जोशी, युवराज नाईक, जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे आदीसह पैहलवान आणि मान्यवर मंडळी उपस्थित होते

# उमेश गुप्ता ठरला 'मुंबई श्री'चा मानकरी

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

मुंबई : मूर्ती छोटी, पण किर्ती महान. अवघ्या सव्वा पाच फूट उंचीच्या यूजी फिटनेसच्या उमेश गुप्ताने संतोष भरणकर आणि उबेद पटेल या आपल्यापेक्षा वजनदार असलेल्या शरीरसौष्ठवपटूंवर मात करत स्पार्टन न्यूट्रिशन्स मुंबई श्रीवर आपल्या नावाची मोहोर उमटवली. परब फिटनेसचा भरणकर उपविजेता तर पटेलने तिसरे स्थान संपादले. महिलांच्या फिजीक स्पोर्ट्समध्ये सुनंदा सातुले तर शरीरसौष्ठवात रेखा शिंदेने बाजी मारली. पुरुषांच्या फिजीक स्पोर्ट्स प्रकारात रोहन भोसले आणि कौस्तुभ हडकर यांनी अव्वल स्थान पटकावले.

चॅम्पियन ऑफ चॅम्पियन्ससाठी स्टेजवर आठही गटविजेते उतरले तेव्हा सर्वांचा नजरा उबेद पटेल आणि संतोष भरणकरकडे वळल्या होत्या. या दोघांपुढे उंचीने कमी असलेला उमेश गुप्ता पीळदार वाटत होता. त्याची उंची, त्याच्या स्नायूंचे आकारमान निश्चित कमी होते, पण त्याच्या आखीवरेखीवपणा आणि पीळदारपणाने त्याला मुंबईच्या शरीरसौष्ठवाचे ऑस्कर जिंकून दिले. गेल्यावर्षी प्रथमच उमेश स्पर्धेत उतरला होता आणि



तो टॉप थ्रीमध्ये बसला होता आणि त्याने यावेळी मुंबई शरीरसौष्ठवात आपली ताकद दाखवली. स्पर्धा जिल्हा पातळीवर असली तरी सव्वाशे पुरुष शरीरसौष्ठवपटूंसह फिजीक स्पोर्ट्सचे ५५ स्पर्धक आणि महिलांच्या गटातील २० पीळदार सौंदर्यवती असे एकंदर २०० स्पर्धकांनी मंचावर उतरून मुंबईची ताकद अवघ्या महाराष्ट्राला दाखवली.

आज पुन्हा एकदा मुंबई उपनगर आणि बृहन्मुंबई शरीरसौष्ठव संघटनेने शरीरसौष्ठवात आपलीच ताकद आहे आणि आपलीच चालते हे दाखवून दिले. शिवसेना सचिव आणि युवानेते सिद्धेश रामदास कदम यांच्या पाठबळामुळे अंधेरीच्या शहाजी राजे क्रीडा संकुलात स्पर्धेचे दिमाखदार आणि देखणे आयोजन शरीरसौष्ठवप्रेमींना अनुभवता आले. या दिमाखदार स्पर्धेचा पुरस्कार सोहळा शरीरसौष्ठव संघटनेचे अध्यक्ष अजय खानविलकर, किट्टी फणसेका, सरचिटणीस राजेश सावंत, विशाल परब, राज्य शरीरसौष्ठवाचे कोषाध्यक्ष सुनिल शेगडे, अब्दुल मुकादम ,विजय झगडे आणि स्पर्धेचे पुरस्कर्ते ऋषभ चोक्सी यांच्या उपस्थितीत पार पडला.

अलिकडच्या काळात महिला व्यायामाकडे वळू लागल्याने त्यांच्यासाठी घेतल्या जाणार्या स्पर्धा महिला वर्गाला प्रेरणादायी ठरु लागल्या आहेत. प्रेक्षकांमध्ये महिलांचे वाढते प्रमाण आणि प्रत्यक्ष सहभाग लक्षणीय ठरत आहे. महिलांच्या शरीरसौष्ठवामध्ये रेखा शिंदे (हर्क्युलस फिटनेस) हिने आपले वर्चस्व राखताना सुनंदा सातुलेला मागे टाकले. महिलांच्या शरीरसौष्ठवात सुनंदाला अपयश आले असले तरी तिने फिजीक स्पोर्ट्समध्ये अव्वल स्थान पटकावले. सुनंदाने दोन्ही गटात सहभाग घेतला होता.

# काल आमदाराचं आऊटगोईंग आज नेत्यांचं इनकमिंग

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

जळगाव : जळगाव जिल्ह्यातील भाजपाच्या अॅड. ललिता पाटील यांनी आज सोमवारी मुंबई येथे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत शिवबंधन बांधत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला. त्यांनी लोकसभा निवडणूक लढविण्याची इच्छा बोलून दाखविल्यानंतर त्याचा ठाकरे सेनेतील प्रवेश महत्वपूर्ण मानला जात आहे.

मुंबईत झालेल्या पक्ष प्रवेशाच्या सोहळ्यासाठी शिवसेना नेते खासदार संजय राऊत, जिल्हासंपर्क प्रमुख संजय सावंत, विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, जिल्हाप्रमुख विष्णू भंगाळे, विराज कावडीया, महानगर प्रमुख शरद तायडे, वैशाली सूर्यवंशी, जिल्हा सहसंपर्कप्रमुख गुलाबराव वाघ आदी उपस्थित होते.

ललिता पाटील या मूळ काँग्रेस पक्षाच्या आहेत, त्यांनी काँग्रेसमध्ये विविध पदे भूषविली आहेत. तीन वर्षांपूर्वी त्यांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला होता. पक्षातर्फे त्यांना पक्षाचे महिला आघाडीचे समन्वयक पद देण्यात आले होते. तरीही त्या पक्षात फारशा सक्रिय दिसून नव्हत्या. त्या पक्ष सोडणार असल्याची चर्चा सुरू होती. दोन दिवसांपूर्वीच त्यांनी मुंबई येथे मातोश्रीवर पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांची भेट घेतली होती. त्याच वेळी त्यांचा प्रवेश होणार हे निश्चित झाले होते. आज त्यांनी मुंबईत मातोश्रीवर पक्ष प्रवेश केला आहे. या वेळी जिल्ह्यातील पक्षाचे पदाधिकारी तसेच अमळनेर येथे त्यांचे समर्थकही मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी ललिता पाटील यांच्या पक्ष प्रवेशाचे स्वागत केले. ठाकरे म्हणाले, जळगाव लोकसभा मतदारसंघात आपल्या पक्षाचा उमेदवार महाविकास आघाडीच्या माध्यमातून विजयी करायचाच आहे. त्यासाठी सर्वांनी ताकदीने कामाला लागण्याचे आवाहन केले. पक्ष प्रवेशानंतर ललिता पाटील म्हणाल्या की, आपण लोकसभेची उमेदवारी मिळेल म्हणून पक्ष प्रवेश केलेला नाही. जर पक्षाने उमेदवारी दिली तर आपण लढणारच आहोत, मात्र, उमेदवारी नाही दिली तरी आपण पक्ष जो उमेदवार देईल, त्याचा जोरदार प्रचार करणार असल्याचेही ललिता पाटील म्हणाल्यात.

# गोपीनाथ मुंडे यांच्या निधनानंतर पंकजा मुंडेंपेक्षा माझी जास्त वाताहात

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**



परभणी : गोपीनाथ मुंडे हे अवेळी गेल्याने पंकजा मुंडे यांच्यापेक्षा माझी जास्त वाताहात झाली. आज गोपीनाथ मुंडे असते तर मी केंद्रामध्ये मंत्री राहिलो असतो, असं रासपचे अध्यक्ष महादेव जानकर म्हणाले. गोपीनाथ मुंडे यांच्या निधनानंतर भाजपने माझ्यासोबत धोका केला तरीपण मी त्यांच्यासोबत इमानदारीने राहिलो. आता माझी शेवटची एकच इच्छा आहे की मला पाच मिनिटं तरी देशाचा पंतप्रधान व्हायचे आहे, असे उद्गार रासपचे अध्यक्ष महादेव जानकर यांनी काढले.

परभणी येथे आयोजित परभणी लोकसभा विजय निर्धार मेळाव्यामध्ये ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर गंगाखेड विधानसभेचे आमदार डॉ. रत्नाकर गुट्टे, राष्ट्रीय सचिव कुमार सुशील, प्रदेश अध्यक्ष काशिनाथ शेवते, प्रदेश सचिव ज्ञानेश्वर सलगर, मराठवाडा विभागीय अध्यक्ष ओमप्रकाश चितळकर यांच्यासह प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.

महादेव जानकर पुढे बोलताना म्हणाले की माढा लोकसभेची जागा देण्याची घोषणा केली आहे. मी शरद पवार यांचे आभार मानतो पण मला काँग्रेस कडून सांगली आणि शिवसेनेकडून परभणी लोकसभेची जागा पाहिजे आहे. त्याचबरोबर महायुतीसोबतही मी वाटाघाटी करत असून महायुतीकडून मला परभणी आणि माढा या दोन लोकसभा मेळाव्यात अशी अपेक्षा आहे. आघाडी किंवा युती जरी नाही झाली तरी स्वबळावर आम्ही या जागा लढवणार असल्याचे जानकर यांनी स्पष्ट केले.

महादेव जानकर म्हणाले की राष्ट्रीय समाज पक्षाची आरक्षणाविषयीची भूमिका स्पष्ट आहे. दोन टक्के मराठा समाज सदन सोडला तर बाकीचा सर्व मराठा समाज आज दारिद्र्यरेषेखाली गेलेला आहे. त्यामुळे मराठा समाजाला आरक्षण देण्याची आमची भूमिका आहे. पण त्याचबरोबर ओबीसींना मिळालेले आरक्षण अबाधित ठेवण्याची देखील आमची भावना आहे. त्यामुळे आम्ही सत्तेत आल्यावर आम्ही जातनिहाय जनगणना करण्यासाठी देखील आग्रह करू असेही जानकर म्हणाले.

परभणी लोकसभा मतदारसंघातून मी उमेदवारी अर्ज भरणार आहेच. पण, मला सर्वच पक्षांना प्रश्न विचारायचा ओ की मी राष्ट्रीय समाज पक्षाचा अध्यक्ष या नात्याने परभणी लोकसभा निवडणूक लढणार आहे. जर माझ्या जागेवर भाजपकडून जे.पी. नड्डा राष्ट्रवादी काँग्रेस कडून शरद पवार, काँग्रेस कडून मल्लिकार्जून खरगे हे जर निवडणूक लढणार असतील तर मी परभणीची जागा सोडायला तयार आहे. पण, एक राष्ट्रीय अध्यक्ष या नात्यानं त्यानी मला परभणी लोकसभेची जागा सोडावी असेही, आवाहन जानकर यांनी केले.

या संपूर्ण विजय निर्धार मेळाव्यात महादेव जानकर हे कार्यकर्त्यांमध्ये बसले होते. त्यामुळे पक्षाचा राष्ट्रीय अध्यक्ष कार्यकर्त्यांमध्ये बसून संपूर्ण कार्यक्रम पाहत असल्याने कार्यकर्त्यांमध्ये एक वेगळीच भावना निर्माण झाली. त्याचबरोबर राष्ट्रीय समाज पक्षाची आर्थिक परिस्थिती तेवढी चांगली नसल्याने कार्यकर्त्यांनी नोटांचा हार घालून पक्षाला चंदा देखील दिला. या मेळाव्याला राष्ट्रीय समाज पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक माणदेश एक्सप्रेस हे पत्रक श्री. शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक, मालक श्री. दीपक गौतम प्रक्षाळे यांच्यासाठी कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२, महावीरनगर, सांगली. पीन ४१६४१६ महाराष्ट्र येथे छापून विठ्ठलनगर, आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली पिन- ४१५३०१ महाराष्ट्र येथून प्रसिद्ध केले. या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इ. विषयी संपादक, मुद्रक, प्रकाशक, मालक सहमत असतीलच असे नाही. RNI Reg.No- MAHMAR/2017/77021 (आटपाडी न्यायकक्षेत)

# महायुतीचे ८० टक्के जागावाटप निश्चित, ठाकरेंच्या मागे जनता नाही

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

नागपूर: लोकसभा निवडणूकांत राज्यात महायुतीच्या जागावाटपावरून विविध चर्चांना उधाण आले आहे. या पार्श्वभूमीवर भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी राज्यात ८० टक्के जागांचे निर्णय झाला असून उर्वरित जागांवर दोन दिवसांत निर्णय होईल, असा दावा केला आहे. नागपुरात सोमवारी ते प्रसारमाध्यमांशी बोलत होते.



महाविकास आघाडीच्या राजकारणाचा आधार जनतेत संभ्रम पसरविण्याचा आहे. त्यामुळे रोज सकाळी उठून जनतेची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला जातो. महायुतीमधील घटक पक्षांना पूर्ण सन्मान दिला जातो. महायुतीच्या ८० टक्के जागांचा निर्णय झाला असून उर्वरित जागांवर येत्या दोन दिवसांत निर्णय होईल. महायुतीमध्ये कोणताही ताणतणाव नसून सर्वांचे एकमत आहे. दिल्लीत महायुतीची बैठकीत यावर चर्चा झाल्यावरच उमेदवारीबाबत योग्य निर्णय होईल, असे बावनकुळे यांनी सांगितले.

यावेळी राष्ट्रवादीचे रोहित पवार यांनी चौकशीला सहकार्य करण्याचे आवाहन त्यांनी केले, ज्याला कर नाही तर डर कशाला! चूक केली नसेल तर ईडीच्या नोटीसचे उत्तर साधेपणाने देता येते. चौकशीअंती निष्कर्ष निघेलच. मात्र ते सोडून तपास यंत्रणांवर दबाव आण्याचा प्रयत्न केला जात आहे, असा आरोप बावनकुळे यांनी लावला.

जेव्हा लोकांचे भले करण्याची संधी तेव्हा उद्धव ठाकरे घरात बसून होते. जनता समजुतदार असून उद्धव ठाकरे यांच्या मागे उभी राहणार नाही, असा चिमटा बावनकुळे यांनी काढला. मनसे व भाजपवरदेखील त्यांनी भाष्य केले. राज ठाकरे हे परखड बोलणारे व्यक्तिमत्त्व आहे. मनसे व भाजपची भूमिका विसंगत नाही. परंतु त्यांच्यासोबत कुठलीही चर्चा झाली नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# हद्दपारीचा भंग करून तिघे गुन्हेगार सांगलीत

## शहर पोलिसांनी केली तात्काळ कारवाई




**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

सांगली : हद्दपारीच्या आदेशाचा भंग करून जिल्ह्यात प्रवेश केलेल्या अभिषेक दिपक कुंटे (वय २०, रा. बुरुड गल्ली, सांगली), करण किशोर ओगानिया (वय १९, रा. गवळी गल्ली, सांगली), समीर रजमान नदाफ (वय ४०, रा. शंभर फुटी, नुरानी मशिदनजीक, गल्ली क्र.२, सांगली) या तिघांना शहर पोलिसांनी अटक केली.

अधिक माहिती अशी, अभिषेक दिपक कुंटे (वय २०, रा. बुरुड गल्ली, सांगली ) या गुन्हेगारास दि. २० जुलै २०२३ रोजी सांगली आणि कोल्हापूर या दोन जिल्ह्यातून दोन वर्षाकरिता हद्दपार केले आहे. मात्र कोणतीही परवानगी न घेता अभिषेक हा आदेशाचा भंग करून कर्नाळ रस्त्यावरील झेंडा चौकात थांबल्याचे दिसताच त्याला ताब्यात घेतले.तसेच कृष्णानदीकाठावर डॉ. वसंतदादा पाटील यांचे समाधी स्थळाच्या मुख्य प्रवेशव्दाराजवळ मध्यरात्री दिडच्या सुमारास हद्दपारीच्या आदेशाचा भंग करून आलेल्या करण किशोर ओगानिया (वय १९, रा. गवळी गल्ली, सांगली ) याला शहर पोलिसांनी ताब्यात घेतले.

सांगली आणि कोल्हापूर जिल्ह्यातून दि. १८ जानेवारी २०२३ रोजी दोन वर्षाकरिता हद्दपार केलेल्या समीर रजमान नदाफ (वय ४०, रा. शंभर फुटी, नुरानी मशिदनजीक, गल्ली क्र.२, सांगली ) शंभर फुटी रस्त्यावर सांगली शहर पोलिसांनी ताब्यात घेतले. सांगली शहर पोलिस ठाण्याचे निरीक्षक संजय मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरणचे उपनिरीक्षक महादेव पोवार आणि पथकाने ही कारवाई केली.

हद्दपारीचा भंग केल्याबद्दल शहर पोलिसांनी अटक केलेले तिघेही गुन्हेगार सराईत आहेत. ते विना परवाना शहरात आले होते. पोलिसांनी वेळीच त्यांच्यावर कारवाई केली.

# राज्यातील सर्वात कमी तापमान पुण्यात तर सोलापूर तापले ; येत्या दिवसांमध्ये तापमानाचा पारा चढणार

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

पुणे : कोकण गोव्यासह संपूर्ण राज्यात तुरळक ठिकाणी सरासरीच्या तुलनेत किंचित वाढ झाली, तर राज्याच्या उर्वरित भागात कमाल तापमान सरासरीच्या जवळपास नोंदवले गेले. राज्यातील सर्वात कमी किमान तापमानाची नोंद पुण्यात १५.३ अंश सेल्सिअस झाली आहे. कमाल तापमान सोलापूर येथे ३९.६ नोंदवले गेले. येत्या दिवसांमध्ये तापमानाचा पारा आणखी वर जाईल, असा अंदाज हवामान खात्याने वर्तविला आहे.

विदर्भ व मराठवाड्यात काही ठिकाणी किमान तापमान सरासरीच्या तुलनेत किंचित वाढले आहे.



राज्यामध्ये जवळपास सर्वत्र हवामान कोरडे राहणार असून, तापमानाचा पारा चढता राहणार असल्याचा इशारा हवामान खात्याने दिला आहे. विदर्भ, मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यांमधील कमाल तापमान वाढू लागले आहे. काही दिवसांमध्ये हा पारा चाळीशी पार करण्याची शक्यता आहे. किमान तापमानातही आता वाढ झाल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे नागरिकांनी उष्णतेपासून बचाव करावा असे आवाहन हवामान विभागाने केले आहे. १५ मार्च नंतर विदर्भात वाऱ्याची परस्पर क्रिया घडून १६ व १७ मार्च रोजी हलक्या पावसाची शक्यता आहे. या दरम्यान कमाल व किमान तापमानात फारसा बदल होणार नाही.

पुण्यामध्ये पुढील चार ते पाच दिवस आकाश निरभ्र राहील. १६ मार्चनंतर आकाश ढगाळ राहणार आहे. किमान तापमान १३ मार्चनंतर २ डिग्रीने घट होण्याची शक्यता आहे. कमाल तापमानात मात्र बदल होणार नसल्याचे हवामान खात्याने सांगितले आहे.

राज्यातील कमाल व किमान तापमान
मुंबई - ३०.९ - २०.८
पुणे - ३६.९ - १५.३
रत्नागिरी - ३२.८ - २०.०
जळगाव - ३५.८ - १७.०
कोल्हापूर - ३७.१ - २१.५
नाशिक - ३५.४ - १५.८
सोलापूर - ३९.६ - २४.६
नांदेड - ३७.२ - २०.४
चंद्रपूर - ३६.२ - २०.८
नागपूर - ३७.० - २२.१

एकीकडे खूप तर दुसरीकडे कमी

राज्यात सोलापूरमध्ये सर्वाधिक ३९.६ तापमान झाल्याने नागरिक हैराण झाले आहेत. तर पुण्यात सर्वात कमी किमान तापमान १५.३ अंशावर नोंदवले आहे. पुण्यात देखील लोहगावात किमान तापमान १८.९ तर इतर शहरात मात्र १५.३ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. शहरातच हवामानत प्रचंड बदल होत असल्याचे दिसत आहे.

# बारामतीकरांनो मला विश्वास आहे, तुम्ही आम्हालाच पुन्हा संधी द्याल - शरद पवार

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

बारामती : आताच्या ज्या तुमच्या खासदार आहेत. त्या देशातील ५१८ खासदरापैकी त्यांचा पहिल्या तीन मध्ये क्रमांक आहे. शिवाय संसदेत ९८ टक्के हजेरी आहे. त्यामुळे अशा खासदाराला तुम्हाला पुन्हा एकदा संधी द्यायची आहे, मला विश्वास आहे ती संधी तुम्ही पुन्हा एकदा द्याल. यावेळी चित्र वेगळं आहे ,पण त्याची चिंता करायचे कारण नाही. असे म्हणत शरद पवारांनीबारामतीकरांकडून सहकार्याची अपेक्षा व्यक्त केली आहे.




बारामती शहरातील पक्ष कार्यालयाला भेट दिली. यावेळी पवार यांचे कार्यकर्त्यांशी जोरदार घोषणाबाजीने स्वागत केले. पवार म्हणाले की, आतापर्यंत जी निवडणूक झाली, त्या निवडणुकीत बारामती आणि महाराष्ट्राने मला मागे पाहायला लावलेले नाही. प्रत्येक निवडणुकीत मला सहकार्य केले. मी कधी प्रचाराला येत नसे, तुमच्यापैकी काहींना आठवत असेल माझी शेवटची सभा मिशन हायस्कूल जवळ झाली होती. यातून मला महाराष्ट्राचे शासन, समाजकारण चालवण्याची संधी मला मिळाली. यातून मला बारामतीकरांमुळे राज्याचे चार वेळा मुख्यमंत्री पद, देशांचे संरक्षण मंत्री पद, दहा वर्ष कृषी मंत्री पद असे अनेक जबाबदाऱ्या पार पाडण्याची संधी मिळाली.

मला वयाच्या २६ व्या वर्षी निवडणूक लढण्याची संधी मिळाली. त्यावेळी माझ्याविरोधात एका साखर कारखान्याचे अध्यक्ष होते. मात्र त्यावेळी हा तरुण मुलगा कारखान्याच्या चेअरमनला कसा टक्कर देईल. पण मी सभेत चक्कर टाकल्यानंतर माझी निवडणूक ही माझी राहिलीच नाही. संपूर्ण निवडणूक तरुण पिढीने हातात घेतली. सायकलवर माझा प्रचार केला. समाजातील लहान घटकाने ही निवडणूक हातात घेतली आणि सत्तर हजार मतांनी मला निवडून दिलं,अशा शब्दात शरद पवार यांनी त्यांच्या पहिल्या निवडणुकीची आठवण सांगितली.

# पुण्यातून धावणार वंदे भारत एक्स्प्रेस

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

पुणे : पुण्यातून वंदे भारत एक्सप्रेस सुरू व्हावी, ही मागणी पुणेकरांकडून गेल्या अनेक दिवसांपासून होत होती. ही मागणी लक्षात घेऊन रेल्वे विभागाकडून कामे सुरू केली होती; मात्र ही रेल्वे नक्की कधी सुरू होणारी याची प्रतीक्षा पुणेकरांना होती. ती प्रतीक्षा आता संपली असून, मंगळवारी (दि. १२) रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दोन नवीन वंदे भारत एक्स्प्रेस गाड्यांना दूरदृश्य प्रणालीद्वारे हिरवा झेंडा दाखवणार आहेत. देशात १० विविध ठिकाणाहून वंदे भारतएक्स्प्रेस धावणार असून आता पुणेकरांना वंदे भारतमधून आरामदायी प्रवास करण्याचा आनंद घेता येणार आहे.



मंगळवारपासून पुणे-बडोदा आणि मुंबई- पुणे-कोल्हापूर या दोन नवीन वंदे भारत एक्स्प्रेस सुरू होत आहेत. या नव्या एक्स्प्रेस सुरू करण्यासाठी पुणे विभागातून देखभाल दुरुस्तीची पूर्ण तयारी करण्यात आली आहे. घोरपडी येथील कोचिंग कॉम्प्लेक्स येथे सर्व यंत्रणा तयार असून, त्यासाठी कर्मचाऱ्यांना प्रशिक्षणही देण्यात आले आहे. नवीन वंदे भारत सुरू झाल्याने प्रवाशांसाठी फायद्याची ठरणार आहे.

सध्या राज्यात बिलासपूर-नागपूर, मुंबई-शिर्डी, मुंबई-सोलापूर, मुंबई-गोवा या मार्गावर 'वंदे भारत' सुरू असून, प्रवाशांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. सध्या पुण्यातून मुंबई-सोलापूर ही एक 'वंदे भारत' धावते, तर नव्याने पुणे-बडोदा, मुंबई-कोल्हापूर या दोन गाड्या धावणार आहेत. त्यामुळे पुणेकरांना सोयीचे ठरणार आहे. सध्या राज्यात बिलासपूर-नागपूर, मुंबई-शिर्डी, मुंबई-सोलापूर, मुंबई-गोवा या मार्गावर 'वंदे भारत' सुरू आहे.

# औषधांच्या किमती कमी करण्यासाठी जीएसटी रद्द करा

## सांगलीतील वैद्यकीय प्रतिनिधींच्या राज्यस्तरीय अधिवेशनात ठराव

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

सांगली : औषधे तसेच वैद्यकीय उपकरणांवरील जीएसटी रद्द करून औषधांच्या किमती कमी कराव्यात. यातून सामान्य रुग्णांना दिलासा मिळेल, अशा मागणीचा ठराव रविवारी वैद्यकीय प्रतिनिधींच्या राज्यस्तरीय अधिवेशनात करण्यात आला.



महाराष्ट्र सेल्स अँड मेडिकल रिप्रेझेंटेटिव्ह असोसिएशनमार्फत सांगलीत तीनदिवसीय राज्य अधिवेशन पार पडले. रविवारी त्याची सांगता झाली. कामगार कायद्याचे संवर्धन, वैद्यकीय प्रतिनिधींचे विविध प्रश्न, केंद्र आणि राज्य सरकारच्या कामगार विरोधी धोरणांबाबत अधिवेशनात चर्चा करण्यात आली. शासन धोरणांना ते मागे घेईपर्यंत विरोध करण्यासह विविध ठराव अधिवेशनामध्ये मंजूर करण्यात आले.

अखिल भारतीय संघटनेचे जनरल सेक्रेटरी कॉ. शंतनू चटर्जी यांच्या मार्गदर्शनाखाली राज्य संघटनेचे महासचिव म्हणून कॉ. श्रीकांत फोपसे यांची, तर अध्यक्ष म्हणून कॉ. नरेंद्र सिंग यांची एकमताने निवड झाली. अधिवेशनात संपूर्ण महाराष्ट्रातून एकूण २८ युनिटमधून जवळपास तीनशे सदस्य उपस्थित होते. सांगली जिल्ह्यातून किशोर केदारी यांची पश्चिम विभागीय सचिव म्हणून निवड करण्यात आली. सांगली जिल्हा कार्यकारिणीतर्फे उपस्थित सर्व युनिटला सन्मानचिन्ह प्रदान करण्यात आले. राज्य संघटनेतर्फे सदस्यत्व संख्या टप्पा पार केलेल्या युनिटचा प्रशस्तिपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

यावेळी सांगली युनिटचे संजय गलगले, हरीश भंडारे, सुहास वाळवेकर, अतुल वीर, अवधूत पुजारी, बाळासाहेब पाटील, अजित मालगावे, योगेश जगदाळे, भालचंद्र देशपांडे, शिवराज जामदार, हेमचंद्र पाटील आदीसह प्रतिनिधी उपस्थित होते.

विक्री उद्दिष्टाच्या नावाखाली होणारे वैद्यकीय प्रतिनिधींचे शोषण बंद करावे, औषधे आणि औषधी उपकरणे यावरील जीएसटी रद्द करून औषधांच्या किमती कमी कराव्यात, डिजिटल माध्यमांद्वारे पाळत ठेवून केल्या जाणाऱ्या गोपनीयतेच्या अधिकाराचे उल्लंघन बंद करावे आदी ठराव या अधिवेशनात करण्यात आले.

# शक्तिपीठ महामार्गातून पूरपट्ट्यातील गावे वगळा

## मोर्चाद्वारे शेकापची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

सांगली : शक्तिपीठ महामार्गातून पूरपट्ट्यातील कर्नाळ, पद्माळे, सांगलीवाडी (ता. मिरज) ही गावे वगळली पाहिजेत तसेच उर्वरित शेतकऱ्यांना एकरी दोन कोटी रुपये भरपाई मिळाली पाहिजे यासह २२ मागण्यांसाठी शेतकरी कामगार पक्षातर्फे जिल्हाधिकारी कार्यालयावर सोमवारी मोर्चा काढला. शासनाने निर्णय न बदलल्यास बाधित शेतकऱ्यांना घेऊन तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही आंदोलकांनी दिला.



शेतकरी कामगार पक्षाचे ड. सुभाष पाटील, ड. अजित सूर्यवंशी, दिगंबर कांबळे, प्रा. बाबुराव लगारे, शरद पवार, प्रवीण पाटील, घनश्याम नलवडे, राहुल जमदाडे, भूषण गुरव, जोतीराम जाधव यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. मोर्चाची सुरुवात विश्रामबाग येथील क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या पुतळ्यापासून झाली. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर मोर्चा आल्यानंतर शेतकऱ्यांनी शक्तिपीठ महामार्ग रद्द करा यासह अनेक घोषणा दिल्या.

ॲड. सुभाष पाटील, ॲड. अजित सूर्यवंशी, दिगंबर कांबळे यांच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकाऱ्यांना २२ मागण्यांचे निवेदन दिले. यामध्ये पूरपट्ट्यातील पद्माळे, कर्नाळ, सांगलीवाडी ही गावे शक्तिपीठातून वगळण्यात यावीत, नागपूर ते गोवा शक्तिपीठ महामार्ग बाधित शेतकऱ्यांना कमीत कमी एकरी दोन कोटी रुपये मोबदला मिळाला पाहिजे तसेच ज्या ठिकाणी एमआयडीसी झोन व महानगरपालिका क्षेत्र असेल तिथे कमीत कमी एकरी चार कोटी रुपये मोबदला मिळणे गरजेचे आहे. संपूर्ण भरपाई आयकर मुक्त मिळाली पाहिजे. बाधित क्षेत्रातील द्राक्ष, आंबा व इतर फळबागा, फळझाडे, विहिरी, बोअरवेल, पाईपलाईन, बांधकामे, पत्राशेड, जनावरांचा गोठा, बेदाणा शेडची भरपाई शेतकऱ्यांनी सांगितलेल्या नुकसानभरपाईच्या चारपट देण्याची गरज आहे.

तालुका मार्ग जिल्हा मार्गाला क्रॉस होईल त्या ठिकाणी ग्रीन फिल्डवर प्रवेश करण्याची तरतूद करा.

बाधित शेतकऱ्यांच्या मुलामुलींना रोजगार द्या.

बाधित शेतकऱ्यांना त्यांच्या मागणीनुसार त्यांचा संपूर्ण मोबदला बँक खात्यात जमा होत नाही, तोपर्यंत शक्तिपीठ महामार्गाचे कसलेही काम सुरू करू नये.

पंचनामा करण्यासाठी येण्यापूर्वी १० दिवस अगोदर लिखित मोजणी नोटीस द्या.

मागील वर्षातील खरेदी दस्त ग्राह्य न धरण्याबाबत काढलेले परिपत्रक रद्द करावे.

# मनोज जरांगेंच्या अडचणी वाढणार

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

मराठा आरक्षण आंदोलनादरम्यान झालेल्या हिंसक घटना आणि इतर गोष्टींबाबत सखोल चौकशी करण्यासाठी विधिमंडळाच्या अधिवेशनादरम्यान एसआयटी चौकशीची घोषणा करण्यात आली होती. त्यानुसार आता नाशिक शहराचे पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांच्या अध्यक्षतेखाली विशेष तपास पथक अर्थात एसआयटी गठीत करण्याचा निर्णय राज्याच्या गृहखात्याकडून घेण्यात आला आहे. तसंच याप्रकरणी चौकशी आणि तपास करून पुढील तीन महिन्यात अहवाल सादर करावा, अशा सूचनाही गृहखात्याकडून देण्यात आल्या आहेत.



मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी काही दिवसांपूर्वी भाजप नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर आक्षेपार्ह भाषेत टीका केली होती. जरांगे पाटील यांच्या या टीकेनंतर सत्ताधारी पक्षाच्या आमदारांनी सभागृहात आक्रमक भूमिका घेत जरांगे पाटील यांच्या भूमिकेची एसआयटी चौकशी करण्याची मागणी केली. त्यानंतर विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी ही मागणी मान्य करत एसआयटीची स्थापना करण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार गृहखात्याकडून आज एसआयटी गठीत करण्यात आली आहे.

गृहखात्याकडून आज जारी करण्यात आलेल्या आदेशात म्हटलं आहे की, महाराष्ट्र विधान मंडळाच्या सन २०२४ च्या पहिल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये दिनांक २७.०२.२०२४ रोजी राज्यातील आरक्षण आंदोलनातील हिंसा पूर्व नियोजित होती किंवा कसे, या विषयाची चर्चा झाली. सदर चर्वेच्या अनुषंगाने मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी, प्रकरणाची एसआयटी मार्फत सखोल चौकशी करावी असे निर्देश दिले आहेत. सदर निर्देशाच्या अनुषंगाने निर्णय घेण्यात आला आहे. याप्रकरणी चौकशी करण्याकरीता संदिप कर्णिक (भापोसे), पोलीस आयुक्त, नाशिक शहर यांच्या अध्यक्षतेखाली विशेष तपास पथक (ड्खढ) गठीत करण्यास मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी मान्यता दिली आहे. उपरोक्त विशेष तपास पथकाने चौकशी करताना राज्यात आरक्षणाविषयी विविध ठिकाणी आंदोलने सुरू असताना आंदोलनाचा गैरफायदा घेऊन सामाजिक सलोखा/वातावरण अस्थिर करण्यासाठी जाळपोळ, दगडफेकीसारख्या हिंसक घटना जाणीवपूर्वक करण्याचा प्रयत्न करणे तसेच मीडिया, सोशल मीडियाचा गैरवापर करुन चुकीची माहिती देऊन तसेच अफवा पसरवून दंगे भडकवण्याचा प्रयत्न करणे, या व इत्यादी बाबींसंदर्भात चौकशी/तपास करुन तीन महिन्यात शासनास अहवाल सादर करावा, अशा सूचना शासनाकडून देण्यात आल्या आहेत. दरम्यान, सदर तपास पथकामध्ये निमंत्रित सदस्य म्हणून तज्ञ व्यक्तींना बोलवण्याचे अधिकार विशेष तपास पथकाचे प्रमुख यांना राहतील. तसेच, सदर विशेष तपास पथकासाठी आवश्यक मनुष्यबळ शासनाच्या सहमतीने नियुक्त करण्याचे अधिकार विशेष तपास पथक प्रमुख यांना राहतील, असंही शासन निर्णयात नमूद करण्यात आलं आहे.

# अन्यथा भाजपाला मत मागायला येणार नाही : आ.जयकुमार गोरे

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

म्हसवड/प्रतिनिधी : भाजपा हा जातीयवाद पसरवणारा, दलित विरोधी, बौद्धांच्या विरोधातील पक्ष म्हणून सतत विरोधक गरळ ओकून लोकांची मने कलूषित करत असतात. मात्र याच भाजपा सरकारने लंडन मधील बाबासाहेबांचे घर ताब्यात घेऊन ते आपल्या देशात आणले. दादरच्या चैत्यभूमीचा आज दिसतोय तो कायापालट व सर्वात उंच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा हीच भाजप उभा करत आहे, हे माझ्या समाज बांधवांनी लक्षात घ्यावे. याच माथी भडकावणाऱ्या विरोधकांनी तुमच्या साठी आज पर्यंत, समाज मंदिर, सांस्कृतिक भवन, पुतळा, वाचनालय का उभे केले नाही? आज ज्या डॉ बाबासाहेब आंबेडकर भवनाचे भुमिपुजन झाले हे येत्या चार महिन्यात इमारत उभे करून विधानसभेचे मत मागण्याची बैठक याच भवनात घेऊन मत मागणार आहे. अन्यथा मत मागता येणार नाही, असे मत माण खटावचे आ.जयकुमार गोरे यांनी म्हसवड येथे व्यक्त केले.

म्हसवड येथील डॉ बाबासाहेब आंबेडकर नगर मधील सांस्कृतिक भवनाच्या समोरील मोकळ्या जागेवर पालिकेच्या वतीने सुसज्ज असे देखणे या परिसरात नसेल अशा इमारतीचा भुमिपुजन सोहळा माण खटावचे आ.जयकुमार गोरे यांचे हस्ते कुदळ मारुन व कोनशिलेचे उदघाटन करण्यात आले. तर समाज बांधवांच्या व महिलांच्या हस्ते नारळ फोडण्यात आले. यावेळी माजी नगराध्यक्ष विजय सिन्हा, विजय धट, नितीन दोशी, वसंत मासाळ, मार्केट कमिटीचे चेअरमन विलास देशमुख, अकिल काझी, सुनील पोरे, सदाशिवशेठ सावंत, सोमेश्वर केवटे, माजी उपनगराध्यक्ष कुमार सरतापे, अंगुली बनसोडे, विकास सरतापे, सौ. सरतापे, जगन्नाथ लोखंडे, लुनेश विरकर, बबन आबदागिरे, आकाश मेंढापुरे, सह समाज बांधव उपस्थित होते.



म्हसवड : येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर नगर येथे कुदळ मारुन व कोनशिलेचे उद्घाटन करताना आम. जयकुमार गोरे व उपस्थित मान्यवर

यावेळी, आ.गोरे म्हणाले, मी ज्या-ज्या वेळी विकास कामाचा शब्द दिला त्या-त्या वेळी तो दिलेला शब्द पूर्ण करण्यासाठी वेळ प्रसंगी पदाचा राजीनामा ही जाहिर केला होता. त्यामुळेच आज जे माण- खटाव मध्ये पाणी दिसत आहे, ते दिसले नसते. म्हसवडच्या पाण्याचा ही कायम स्वरूपी प्रश्न सुटला असून विधानसभा निवडणुकीपूर्वी म्हसवड व परिसराला रोज पाणी मिळणार आहे. पाठीमागे म्हसवडच्या नागरीकांनी केलेल्या परिवर्तन मुळे दहा पंधरा दिवसांनी तुम्ही पाणी पित आहात, पाच वर्षात एक ही विकास काम झाले नाही. माझ्या काळात झालेली कामे ही नगराध्यक्ष व त्या बॉडीला व्यवस्थीत ठेवता आली नाहीत. स्मशानभूमी असो वा गार्डन ,काय अवस्था केली आहे? पालिके शेजारील इमारतीला साधी खिडकी बसवता आली नाही, असे म्हणून सत्ताधारी गटावर निशाणा साधत पुढे आ.गोरे म्हणाले, मी ही फुलेंचा वंशज आहे. माझे आडनाव व माझे मूळ गाव कटगुण आहे, हे विसरु नका. मी भाजपा मध्ये असलो तरी ही शाहू, आंबेडकर, छ.शिवाजी महाराज, महात्मा फुले यांना मानणारा बहुजन असल्याचे ते म्हणाले.

यावेळी मुख्याधिकारी डॉ. सचिन माने, इंजि. चैतन्य देशमाने, रोहित सरतापे, प्रणव सरतापे, शुभम सरतापे, वैभव सरतापे, विकास सरतापे, धनाजी बनसोडे, अंगुली बनसोडे, सागर सरतापे आदी समाज बांधवानी आ. गोरे यांचा सत्कार केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार गणेश म्हेत्रे यांनी केले.

# मनोज जरांगे-पाटील यांनी लोकसभा लढवावी

## महेश खराडे : स्वाभिमानी; कडून जरांगे पाटलांना पाठिंब्याचे पत्र

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

सांगली : मराठा आरक्षण चळवळीचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी जालना किंवा बीड लोकसभा निवडणूक लढवावी, स्वाभिमानी शेतकरी संघटना बिनशर्त पाठींबा देईल असे पत्र 'स्वाभिमानीच्या' वतीने मनोज जरांगे पाटील यांना जिल्हाध्यक्ष महेश खराडे यांनी दिले.

यावेळी बोलताना महेश खराडे म्हणाले, मनोज जरांगे पाटील हे गेली अनेक वर्षे मराठा आरक्षणासाठी संघर्ष करत आहेत. त्याच्या लढ्यामुळेच कुणबी मराठा समाजाचा आरक्षणाचा मार्ग मोकळा झाला. राज्यात ५३ लाख मराठ्यांना कुणबी आरक्षण मिळणार आहे हे फार मोठे यश आहे.



सांगली : मनोज जरांगे पाटील यांनी लोकसभा लढवावी यासाठी त्यांना पाठिंब्याचे पत्र देताना महेश खराडे व उपस्थित मान्यवर

रस्त्यावर लढाई, रस्त्यावर संघर्ष करणारे संघर्ष योद्धे संसदेत ही असले पाहिजेत ही आमची भूमिका आहे. राजू शेट्टी व प्रदेश अध्यक्ष संदीप जगताप यांच्याशी चर्चा करून त्यांना पाठींबा देणारे पत्र देण्यात आले आहे. मराठा समाजाचे अन्य प्रश्न मार्गी लावण्या बरोबरच आरक्षणाचे सर्व प्रश्न मार्गी लावण्यासाठी संसद हाच अंतिम मार्ग आहे. त्यामुळे तुम्ही संसदेत गेले पाहिजे, तुम्ही तुमच्या भूमिकेवर पुनर्विचार करावा अशी मागणी केली. त्यावर त्यांनी योग्य वेळी योग्य निर्णय घेऊ अशी ग्वाही दिली.

यावेळी स्वाभिमानीचे जालना जिल्हाध्यक्ष सुरेश काळे, बीड चे जिल्हाध्यक्ष श्रीनिवास भोसले, राजेंद्र भाऊ पाटील, भुजंग काका पाटील, सुरज पाटील, सुरेश पचिंबरे, दत्ता भोसले, अंकुश तारख आदिसह अन्य उपस्थित होते.

# ए. वाय. पाटलांनी स्वत: राजकीय आत्मघात करून घेतला, मंत्री हसन मुश्रीफांचा घणाघात

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

सरवडे : आपल्या कार्यकर्त्यांना विरोधकांच्या दावणीला बांधणाऱ्या आणि वरिष्ठांचे आदेश धुडकावणाऱ्या ए. वाय. पाटील यांना जनतेने 'बिद्री'च्या निवडणुकीत जमिनीवर आणले. परंतु स्वतःच्या अपयशाचे खापर दुसऱ्यावर फोडणाऱ्या ए.वाय. यांनी आत्मपरीक्षण करावे. त्यांनी राजकीय आत्मघात करून घेतल्याचा घणाघात पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनी केला. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)च्या वतीने नरतवडे येथील कार्यकर्ता मेळाव्यात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी माजी आमदार के.पी. पाटील होते.

मुश्रीफ म्हणाले, मेहुण्या-पाहुण्यांचे नातेसंबंध टिकावेत यासाठी नेहमी प्रयत्न केला. मात्र, राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष असताना ते शिंदे गटात जाणार, भाजप प्रवेश व महामंडळावर निवड होणार अशा चर्चा होत्या. बिद्रीच्या निवडणुकीत त्यांच्या अटीशर्ती मी मान्य केल्या, पण आम्हाला खेळवत त्यांनी विरोधकांशी हातमिळवणी केली.




ते स्वाभिमानी कार्यकर्त्यांना रुचले नाही. ते पराभवाने उद्विग्न झाले असून खोटेनाटे आरोप करत आहेत. पण त्यांच्या राष्ट्रवादी कार्यकर्त्यांच्या पाठीशी मी हिमालयासारखा उभा असून जिल्हा बँकेत असणाऱ्या शेतकऱ्यांच्या सर्व कामासाठी कार्यकर्त्यांनी मला थेट भेटावे.

के. पी. पाटील म्हणाले, पहिल्या निवडणुकीपासून राधानगरीच्या जनतेने मला पाठबळ दिले. परंतु मध्यंतरी आमदारकीच्या दहा वर्षांच्या काळात सोळांकुरच्या टोलनाक्याने आपल्यात व जनतेत अंतर आले. हा टोलनाकाच कायमचा बंद झाला आहे. जनतेने अडीअडचणी सोडविण्यासाठी थेट आपल्यापर्यंत यावे. माझ्या कार्यकर्त्यांची अडवणूक कराल तर खबरदार, असा सज्जड इशाराही त्यांनी ए.वाय. यांना दिला.

यावेळी पक्षाचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब पाटील, केडीसीसीचे संचालक भैय्या माने, तालुकाध्यक्ष व गोकुळचे संचालक प्रा. किसन चौगले, भोगावतीचे संचालक धैर्यशील पाटील, हुतात्मा सूतगिरणीचे अध्यक्ष उमेश भोईटे, तानाजी ढोकरे, तानाजी खोत, नामदेव पाटील यांनी मनोगत व्यक्त केले.

गोकुळचे संचालक युवराज पाटील, केडीसीसीचे संचालक रणजितसिंह पाटील, अनिल साळोखे, विनय पाटील, मनोज फराकटे, विकास पाटील, अभिषेक डोंगळे, बिद्रीचे संचालक राजेंद्र पाटील, राजेंद्र भाटळे, फिरोजखान पाटील, धनाजी देसाई, पंडित केणे, मधुआप्पा देसाई, दीपक किल्लेदार, विश्वनाथ कुंभार, एकनाथ पाटील, अशोक चौगले आदी उपस्थित होते.

# निवडणुकीत आम्हीच सरकारचा करेक्ट कार्यक्रम करणार: मनोज जरांगे

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

परभणी :मराठा आरक्षणाच्या दृष्टीने सरकारने दिलेल्या आश्वासनाची पूर्तता केली नाही, मागणी वेगळी आणि दिलेलं आरक्षण वेगळं ही भूमिका समाजाला मान्य नाही. सरकारकडून आम्ही करेक्ट कार्यक्रम करतो असं सांगत जात असले तरीही, आता तुमची वेळ आमच्या हातात आहे. आगामी काळात होणाऱ्या निवडणुकीत मराठा समाज निश्चितच तुमचा करेक्ट कार्यक्रम करेल असा विश्वास मनोज जरांगे पाटील यांनी परभणी शहरात सोमवारी संवाद यात्रेच्या माध्यमातून समाज बांधवांशी बोलत व्यक्त केला.

गेल्या अनेक दिवसापासून मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण द्यावे, अशी मागणी आहे. त्यासाठी सरकारने वेळोवेळी आम्हाला आश्वासने पण दिली. परंतु समाजाची दिशाभूल करत अपेक्षित नसताना वेगळा प्रवर्ग निर्माण करून दहा टक्के आरक्षण दिले. मात्र, हे आरक्षण कायद्याच्या चौकटीत टिकणार नाही. ओबीसी आरक्षणातून मागणी असताना त्याकडे सरकारने दुर्लक्ष करून समाजाची दिशाभूल केली. यासह सगे सोयऱ्यांच्या अध्यादेशाची अंमलबजावणी न करणाऱ्या सरकारसह लोकप्रतिनिधींचा मराठा समाज आगामी निवडणुकीत करेक्ट कार्यक्रम करेल, अशी भूमिका यावेळी जरांगे पाटलांनी मांडली.

मुख्यमंत्र्यांसह उपमुख्यमंत्र्यांचा आम्ही सन्मान केला, वारंवार त्यांनी दिलेल्या मुदतीपेक्षा आम्ही सरकारला मराठा आरक्षण मिळण्यासाठी अधिक वेळ दिला. परंतु त्यांनी वेळेवर समाजाची दिशाभूल करून आम्हाला अंधारात ठेवले. त्यामुळे आगामी काळात निश्चितच समाज त्याचा बदला घेणार हे नक्की.

# मेट्रोची धाव आता वाघोलीत व वनाजकडून चांदणी चौकात

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

पुणे: प्रवाशांची मागणी असलेल्या रामवाडी ते वाघोली व वनाज ते चांदणी चौक या विस्तारीत मेट्रो मार्गाला राज्य मंत्रीमंडळाने सोमवारी मंजूरी दिली. आता हे दोन्ही प्रस्ताव अंतीम मंजूरीसाठी केंद्र सरकाकडे पाठवले जातील. तिथे मेट्रो प्रकल्पांशी संबधित मंत्रालय, त्यानंतर वित्त मंत्रालय यांची मंजूरी मिळाल्यानंतर केंद्रीय मंत्रीमंडळ त्यावर शिक्कामोर्तब करेल. लोकसभा निवडणूक आचारसंहितेत ही मंजूरी अडकण्याची शक्यता आहे.

विस्तारीत मार्गाचा हा प्रस्ताव महापालिकेने महामेट्रोच्या माध्यमातून राज्य सरकारकडे पाठवला होता. वनाज ते रामवाडी या मार्गाचे काम सुरू झाल्यानंतर लगेचच ही मागणी करण्यात आली होती. रामवाडी ते वाघोली हे अंतर साडेअकरा किलोमीटर आहे. त्यावर ११ स्थानके आहेत. वनाज ते चांदणी चौक हे अंतर सव्वा किलोमीटरचे आहे व त्यावर २ स्थानके आहेत. वनाज ते रामवाडी या मेट्रो मार्गाचे काम आता पूर्ण झाले असून त्यावर व्यावसायिक तत्वावर मेट्रो धावत आहे. या निर्णयामुळे आता चांदणी चौकातून थेट वाघोलीत मेट्रोने जाणे सोपे होणार आहे.

राज्य सरकारने मंजूर केलेला हा प्रस्ताव आता केंद्र सरकारकडे मंजूरीसाठी जाईल. तिथे या प्रस्तावाची छाननी होईल. त्यात दुरूस्त्या सुचवल्या जातील. त्यानंतर वित्त मंत्रालयाकडे हा प्रस्ताव जाईल. तिथे प्रस्तावाचा एकूण खर्च, त्याचे नियोजन, त्याची विभागणी याविषयी चर्च होऊन नंतर केंद्रीय मंत्रीमंडळाची अंतीम मजूरी मिळेल.

याआधीच्या मेट्रो प्रकल्पांप्रमाणेच केंद्र व राज्य दोघे मिळून प्रत्येकी ४० टक्के व २० टक्के रक्कम महापालिकेची अशी खर्चाची विभागणी असेल. महामेट्रोकडून हे काम करण्यात येईल. सध्या या मार्गाचे काम पूर्ण झाले आहे, मात्र या कामासाठीचे डेपो व अन्य मुलभूत सुविधा तयार असल्याने कामाला सुरूवात करणे सोपे जाणार आहे. तरीही निविदा वगैरे प्रक्रिया पार पाडाव्या लागतील असे मेट्रोच्या प्रत्यक्ष फिल्डवर काम करणाऱ्या अधिकाऱ्यांनी सांगितले. लोकसभा निवडणूकीच्या आचारसंहितेत पुढील मंजूऱ्या अडकू नयेत अशी या अधिकाऱ्यांची भावना आहे.

महामेट्रोला या मंजूरीची प्रतिक्षा होती. त्याचा प्रकल्प अहवाल महामेट्रोनेच केला होता. यापुढील केंद्र सरकार स्तरावरील मंजूरीला साधारण दोन महिने लागतील असे दिसते. त्यानंतर निविदा प्रक्रियेला काही कालावधी लागेल. नंतर काम सुरू होईल. काम सुरू झाल्यानंतर ते जास्तीतजास्त लवकर करण्याचा महामेट्रोचा प्रयत्न असेल.-

# मोहमद शमी आयपीएल टी-२० विश्वचषक स्पर्धेलाही मुकणार

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

नवी दिल्ली : टी२० विश्वचषक २०२४ जूनमध्ये अमेरिका आणि वेस्ट इंडिजमध्ये होणार आहे. या स्पर्धेपूर्वी टीम इंडियाला मोठा धक्का बसला आहे. मागील वर्षी वन-डे विश्वचषक स्पर्धा गाजविणारा टीम इंडियाचा वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी टी२० विश्वचषक स्पर्धेला मुकावे लागणार आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाचे सचिव जय शहा यांनी या माहितीला दुजोरा दिला आहे.




'बीसीसीआय' सचिव जय शहा म्हणाले, शमीवर शस्त्रक्रिया झाली आहे, तो भारतात परतला आहे.आता बांगलादेशविरुद्ध सप्टेंबरमध्ये होणाऱ्या दोन कसोटी आणि तीन टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांच्या मालिकेत खेळताना दिसणार आहे. घरच्या मालिकेसाठी शमीचे पुनरागमन होण्याची शक्यता आहे. जय शहा यांनी दिलेल्या माहितीमुळे मोहमद शमी हा आयपीएलबरोबरच आता जून २०२४ मध्ये अमेरिका आणि वेस्ट इंडिजमध्ये टी२० विश्वचषक स्पर्धेला मुकणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. फोटो मोहमद शमी

# शांतिगिरी महाराज यांनी घेतली मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

नाशिक- लोकसभा निवडणुकीसाठी नाशिक किंवा संभाजीनगर मधून इच्छुक उमेदवार असणाऱ्या जनार्दन स्वामी महाराजांचे शिष्य शांतिगिरी महाराज यांनी गेल्या आठवड्यात राज ठाकरे यांची भेट घेण्याचा प्रयत्न केला मात्र नंतर त्यांना थेट मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून निमंत्रण आल्याने राज यांची भेट टाळून ते मध्यरात्री एकनाथ शिंदे यांना मुंबईत भेटले आहे. दोघांची उद्या पुन्हा बैठक होणार असून त्यामुळे नव्या समीकरणांची नांदी ठरणार आहे.

राज ठाकरे नाशिकच्या दौऱ्यात असतानाच शांतिगिरी महाराज यांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या कार्यालयातून दूरध्वनी आला होता आणि त्यामुळेच त्यांनी त्यांची भेट घेऊन घेण्याचे ठरवले असे शांतिगिरी महाराजांच्या भक्त परिवाराकडून सांगण्यात आले. राज्यातील सात ते आठ ठिकाणी बाबाजी भक्त परिवार हा निर्णय ठरण्याची शक्यता असून त्यामुळेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांना जवळ केले आहे.



या दोघांमध्ये अंतिम चर्चा उद्या होणार असली तरी शांतिगिरी महाराज हे नाशिकमधून इच्छुक आहेत त्यामुळे नाशिकचे शिंदे गटाचे विद्यमान खासदार हेमंत गोडसे यांच्या उमेदवारीचे काय असा प्रश्न आता केला जात आहे.

# राजकारणात सारं काही अनिश्चित: निलेश लंके



**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

मुंबई/अहमदनगर - राष्ट्रवादी काँग्रेसअजित पवार गटातील आमदार निलेश लंके लवकरच शरद पवार गटात प्रवेश करणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली होती. विशेष म्हणजे खासदार अमोल कोल्हे आणि लंके यांची भेट झाली होती, त्यानंतर लवकरच निलेश लंके हे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात येतील, असा दावाही कोल्हेंनी केला होता. आता, निलेश लंकेंच्या शरद पवार गटातील प्रवेशाबाबत स्वत: लंकेंनी भूमिका स्पष्ट केली. मात्र, मी लोकसभा निवडणूक लढवावी, अशी माझ्या सहकाऱ्यांची इच्छा आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

-अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर विधानसभा मतदारसंघाचे आमदार राष्ट्रवादीतील फुटीनंतर अजित पवार गटात सामिल झाले. मात्र, आता पुन्हा ते घरवापसी करुन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात येणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात आहे. याबाबत बोलताना लंके म्हणाले की, मी लोकसभा निवडणूक लढवावी अशी आमच्या सहकाऱ्यांची इच्छा आहे. मात्र, सध्याचं राजकारण हे अनिश्चितेचं बनलं आहे. त्यामुळे, मी लोकसभा निवडणूक लढेल की नाही हे आत्ताच सांगता येणार नाही, असे लंकेंनी म्हटले. तसेच, शरद पवार गटातील प्रवेशाबाबतही त्यांनी स्पष्टपणे भूमिका मांडली नाही.

''माझं अजून काहीच ठरलेले नाही. राजकारण हे क्षणाला बदलत असते. राजकारणात पुढील काळातील गोष्टींबाबत आत्ता चर्चा करणे, योग्य नाही. त्याला काही अर्थही नसतो. तुम्ही सर्वजण या सर्वांचे साक्षीदार आहात. राजकारणात पुढे काय होणार आहे? हे कोणालाच माहिती नसते. काही काळानंतर मीडियासमोर वेगळेच चित्र दिसते. लोकसभा मतदारसंघात मी संपर्क वाढवला आहे. माझ्या सहकाऱ्यांची देखील इच्छा आहे. मात्र, अद्याप मी त्याबाबतचा ठोस निर्णय घेतलेला नाही.'', असे स्पष्टीकरण निलेश लंकेंकडून देण्यात आलं आहे. तर, निलेश लंके शरद पवार यांच्या राष्ट्रवादीत आमच्यासोबत आले तर स्वागतच, असे आमदार रोहित पवार यांनी म्हटले आहे.

आगामी लोकसभा निवडणुकांची घोषणा अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपली असून शिवसेना उद्धव ठाकरे आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाने काही जागांवर उमेदवारांची घोषणाही केली आहे. जागावाटपावरुन राजकीय पक्षांची कसरत होत असून अहमदनगरच्या राजकारणात अत्यंत रंजक घडामोडी पाहायला मिळत आहेत. भाजपा नेते आणि खासदार सुजय विखे यांचा अहमदनगर दक्षिण लोकसभा मतदारसंघ सध्या केंद्रबिंदू ठरला आहे. कारण, गेल्या काही दिवसांपासून अजित पवार गटाचे आमदार निलेश लंके यांचे नाव अहमदनगर दक्षिणमधील संभाव्य उमेदवार म्हणून चर्चेत आहे.

आमदार अमोल मिटकरी यांनीही याबाबत माहिती देताना, आमदार निलेश लंके हे कुठेही जाणार नाहीत, असे म्हटले आहे. तसेच, ट्विट करुन नाव न घेता रोहित पवारांवर हल्लाबोलही केला. ''लंके साहेब, तुमच्या खांद्यावर बंदूक ठेवली जातेय, दादांची साथ सोडू नका'', असं आवाहन आमदार अमोल मिटकरी यांनी केलं आहे. ''दादांची साथ सोडु नका. तुम्हाला इतरांपेक्षा उज्वल राजकीय भविष्य आहे. तुतारी गटाला लोकसभा लढवायची एवढीच हौस असेल तर बालमित्र मंडळाच्या अध्यक्षाला मैदानात उतरवुन बघा म्हणावं. तुम्ही एक सामान्य आहा म्हणुन विनंती'' असे म्हणत मिटकरी यांनी ट्विटरवरुन आमदार रोहित पवारांचे नाव न घेता त्यांच्यावर टीका केली आहे.